VOL- IX ISSUE- IX SEPTEMBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# अध्ययन अध्यापनामध्ये समुदाय सहभाग

[1]प्रा.डॉ.प्रतिभा पाटणकर
अधिविभाग प्रमुख
शिक्षणशास्त्र अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

[2]डॉ.नगिना माळी
शिक्षणशास्त्र अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
Email.naginamali2012@gmail.com

समुदाय सहभाग म्हणजे शाळा,महाविद्यालये व विद्यापीठे यांचा समुदायामध्ये अथवा समाजामध्ये सहभाग व समूहाचा शाळा, महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये सहभाग. अर्थात या दोघांमध्ये एक विशिष्ट सहसंबंध ,संप्रेषण व विचारांची देवाण-घेवाण अपेक्षित असते.

शाळा महाविद्यालये हे राष्ट्रीय सेवायोजना,स्काऊट,एन सी सी यांसारख्या अभ्यासेतर उपक्रमामधून समुदायामध्ये सहभागी होतात. तथापि प्रत्यक्ष अध्ययन अध्यापनामध्ये देखील त्यांचा सहभाग घेता येईल. समुदयामध्ये असलेले विशिष्ट विषयातील , क्षेत्रातील तज्ज्ञ यांचा सहभाग घेता येतो. उदा. शेतकरी , वीटभट्टी कामगार , इलेक्ट्रिशीयन इ.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ने सुद्धा समुदाय सहभागावर भर दिला आहे, याचे कारण हेच की समुदाय व शिक्षण हे एकमेकांपासून दूर राहू नये. दोघांच्या विचाराने दोघांचाही विकास व्हावा यासाठी समुदाय सहभागास civic engagement, public engagement असेही म्हटले जाते.एक सुजाण, जबाबदार, सक्रिय नागरिक निर्माण करण्यासाठी शिक्षण प्रक्रियेमध्ये समूहाचा सहभाग आवश्यक आहे.

पायाभूत सुधारणा आणि साध्य करण्याच्या कामगिरीत समुदायातील प्रत्येक सुशिक्षित व्यक्तींने जर एका विद्यार्थ्याला व्यक्तीला वाचायला शिकविण्याची / जबाबदारी घेतली तर देशातील परिस्थिती झपाट्याने बदलेल.अध्ययन अधिक सुधारण्यासाठी समुदायाच्या सहभागाचा प्रयत्न केला जाईल.

अध्ययन अधिक सुधारण्यासाठी समुदायाच्या आणि माजी विद्यार्थ्यांच्या ऐच्छिक सहभागाचा प्रयत्न केला जाईल आणि त्यासाठी पुढील गोष्टी प्रदान केल्या जातील. एकास एक शिकवणे, साक्षरता शिक्षण आणि अतिरिक्त मदत सत्रांचे आयोजन, शिक्षकांना शिकवण्यासाठी मदत आणि मार्गदर्शन, विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन आणि सल्ला. या संदर्भात ,सक्रिय आणि निरोगी जेष्ठ नागरिक ,शाळेचे माजी विद्यार्थी आणि स्थानिक समुदाय सदस्यांचे योग्य प्रकारे सहाय्य मिळविले जाईल यासाठी साक्षर .स्वयंसेवक ,सेवानिवृत्त शास्त्रज्ञ/ शासकीय / निमसरकारी कर्मचारी / माजी विद्यार्थी आणि शिक्षक यांचे डेटाबेस तयार केले जातील.

**समुदाय सहभागाचा अर्थ -**

जॉन ड्युई यांच्यामते शाळा हे समाजाचे छोटे रूप आहे शाळेचे प्रतिबिंब समाजात पडते तर समाज शाळेस संस्कृती देत असतो.तर शाळांची अर्थात शिक्षणाची ही जबाबदारी आहे की समाज जाणून घेणे, समाजाच्या समस्या सोडविणे, जाणीव जागृती करणे, उद्बोधन प्रबोधन करणे, किमान समाजास त्या समस्या सोडविण्यास सक्षम तरी करणे.

या सगळ्याचा हेतू हाच असतो की शिक्षण व समुदाय एकसोबत गेले पाहिजे .शिक्षण घेणारा विद्यार्थी

म्हणा अथवा प्रौढ अध्ययनार्थी म्हणा त्याला समूहात-समाजात सहभागी होता आले पाहिजे. याचे पडसाद अध्ययनाची गुणवत्ता सुधारण्यावर तर पडतेच शिवाय समाजाची वास्तव्य स्थिती समोर येते.एखादी समस्या कशी सोडवावयाची याची दृष्टी येते, कोणते मार्ग अवलंबवावेत हे कळते व एकजुटीने गुणवतेकडे जाता येते.

**मेंदू आधारित अध्ययनामध्ये समुदाय सहभाग**

'विद्यार्थी कसा विचार करतो' याचा विचार मेंदू आधारित अध्ययनामध्ये होत असतो. त्या अनुषंगाने अध्ययन अध्यापन पद्धती, तंत्रे ,साधने वापरली जातात.ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या बोधात्मक कार्यास प्रेरणा मिळेल. याठिकाणी समुदाय सहभाग घेता येतो तो म्हणजे अध्ययन अध्यापनामध्ये.मेंदू आधारित अध्ययनात अनुभवांची देवाण-घेवाण सिनाप्सीसद्वारे होत असते. हे अनुभव जेवढे प्रबळ वरचेवर मिळणारे असतील तितका वेळ सिनाप्सीसची क्षमता वाढतेच शिवाय तो अनुभव दीर्घकालीन लक्षातही राहतो. जर तो अनुभव कृतीयुक्त, चर्चेद्वारे असेल तर स्मरणक्षमता वाढते. समुदाय सहभाग प्रत्यक्ष कृतीवर भर देतो, समाज सदस्यांशी चर्चेवर भर देतो. म्हणून समुदाय सहभाग मेंदू आधारित अध्ययनास पूरकच ठरतो. मेंदू आधारित अध्ययनाची तत्त्वे पाहता मेंदू हा कोणत्याही गोष्टीवर प्रक्रिया करतो,अध्ययन ही सहभागात्मक प्रक्रिया असते, मेंदू नेहमी शोधाच्या कार्यात मग्न असतो, मेंदू हा भावनाशील आहे, अध्ययनात लक्षपूर्ती महत्त्वाची असते,प्रत्येक मेंदू विशिष्ट मार्ग निवडतो, अध्ययन हे जाणीवपूर्वक व अजानतेपणीही केले जाते. अध्ययन हे आव्हानांना सामोरे जाण्यासाठी प्रेरणा देते. ही तत्त्वे पाहता प्रत्येक ठिकाणी समुदाय सहभाग मदत करतो जसे की

- सहभागात्मक समुदाय अध्ययनाद्वारे
- विद्यार्थ्यांना समाजाधारीत शोधकाम देऊन
- समाजसमस्या सोडविण्यास देऊन
- समाजाधारीत वैयक्तिक व गटकार्य देऊन
- समाज आव्हाने समजून घेऊन अध्ययन करणे इत्यादी.

**ज्ञानरचनावादामध्ये समुदाय सहभाग -**

ज्ञानरचनावादाचे गृहीतक पाहता विद्यार्थी स्वतःच्या ज्ञानाची रचना स्वतः करू शकतो;विद्यार्थी हा मातीचा गोळा नसून तो स्वतःसोबत काही अनुभव घेऊन येत असतो म्हणून त्याला आधी काय येते हे पाहून शिक्षकांनी केवळ सुविधादाता म्हणून मार्गदर्शन करावे. त्यासाठी अध्ययन अध्यापनाचे नियोजन करावे म्हणजेच अनुभव महत्त्वाचा.हा अनुभव समाज, परिस्थिती, पर्यावरण निरीक्षण, कृती, ऐकणे ,पाहणे या बाबीतून मिळत असतो .विद्यार्थी समाजामध्ये राहून हे अनुभव घेत असतो. जरी या अनुभवांमध्ये परत एक वेळ गुणवता आणायची असेल तर समुदाय सहभाग उपाय ठरतो.विद्यार्थ्यांना समुदाय सहभागाद्वारे समाज निरीक्षणास वाव दिला, पर्यावरण समजण्यास वाव दिला, समाज मंडळींशी चर्चा करण्यास सांगितले तर नवनवीन अनुभव मिळत जातील व त्याचा वापर करणे सोपस्कार होईल. ज्या गोष्टी पूर्वी विद्यार्थ्याने पाहिल्या त्याच परत निरीक्षणात आल्या तर पूर्व अनुभव पक्का होऊ शकतो म्हणून ज्ञानरचनावादास समुदाय सहभाग मदत करतो.

**समुदाय सहभाग कोठे कोठे घेता येईल ?**

- अभ्यासक्रमातील एखादा भाग शिक्षकांनी न शिकवता तो समुदायांच्या ज्या व्यवसायांशी, पर्यावरणाची, परिस्थितीशी संबंधित असेल त्याच्याशी संबंधित व्यक्तीद्वारे तो शिकवता येईल .
- त्या विशिष्ट परिस्थितीत, पर्यावरणात विद्यार्थ्यांनाच घेऊन जाता येईल व त्यांना प्रत्यक्ष ज्ञान देता येईल.
- समाजाची समस्या ही शाळेची समस्या समजून जेव्हा त्या समस्या शाळा व संस्थापर्यंत येतील तेव्हा त्या सोडवण्यात शाळा संस्थांना अभिरुची दाखवता येईल .

- शाळा -संस्थांची समस्या ही समाजाची समस्या समजून ती समाजापर्यंत नेऊन त्यावर सर्वानुमते निर्णय घेता येईल.
- समस्यांच नव्हे तर एखादा उपक्रम, कार्यक्रम, योजना, नवोपक्रम समाजापर्यंत पोहोचवता येईल अर्थात शासकीय योजनांची माहिती देता येईल.
- आपण ज्या समाजात राहतो- वावरतो विकास करतो त्याला समजून घेणे आपले कर्तव्य समजून विद्यार्थ्यांना समुदाय सहभाग घेता येईल .
- एखाद्या गोष्टीबाबत जाणीव जागृती उद्दबोधन प्रबोधन करता येते ज्याद्दवारे समाजास ती समस्या नसून आव्हान म्हणून पाहता येईल.

**अध्ययन अध्यापन दृष्टिकोन आणि समुदाय सहभाग**

**१)अनुभवाधिष्ठित अध्ययन (Experiential learning) -**

समुदाय सहभागाद्वारे विद्यार्थी प्रत्यक्ष कृतीद्वारे शिकणार असतो. येथे केवळ वरवरच्या ज्ञानावर अवलंबून न राहता विद्यार्थी चर्चा करून, शोधून, ज्ञानाचा पडताळा घेऊन ते पडताळलेले ज्ञान वापरणार असतो.प्रत्यक्ष त्या परिस्थितीत जाऊन पाहून, निरीक्षण करून, नोंद करून ,कृती करून शिकणार असतो. या सगळ्यात तो त्याचा अनुभव वापरणारही असतो व अनुभव घेणारही असतो.अर्थात, विद्यार्थी स्वतः विशिष्ट गोष्टींचा अनुभव घेऊन शिकणार असतो. म्हणून त्यास अनुभवाधिष्ठित अध्ययन म्हणतात हा अनुभव वापरण्याचे व घेण्याचे मार्ग पाहता -

- प्रत्यक्ष स्थळांना भेट
- सामाजिक उपक्रमात सहभाग
- नवकामावर समाज सदस्यांशी चर्चा
- समाज निरीक्षण
- समस्यांवर समाज सदस्यांशी चर्चा
- प्रत्यक्ष कृती करणे
- वर्ग मित्रांशी चर्चा
- घेतलेल्या ज्ञानाचे उपयोजन

**२) कृतीतून शिक्षण- (Learning by doing) -**

समुदाय सहभाग हा कृतीवर भर देतो, कृतीतून घेतलेल्या ज्ञानाचा प्रभाव दीर्घकालीन राहतो. कृतीमध्ये हात, डोळे व मेंदू या तिन्हींचा सहभाग असतो त्यामुळे विद्यार्थी घेतलेले ज्ञान दीर्घकालीन जतनही करू शकतो. समुदाय सहभागा दरम्यान अभ्यासक्रमाचे असे नियोजन करावे लागेल जसे की तो भाग त्या कृतीतून पूर्ण होईल. सर्वच भाग कृतीतून घेता येईल असे नाही पण 70% भाग पूर्ण करता येतो. कृती कमी कालावधीच्या वा जास्त कालावधीच्या हे तिच्या व्याप्तीवरून ठरेल.

**या कृती कशाद्वारे घेता येतील तर-**

- जाणीव जागृती उपक्रमात सहभाग
- पथनाट्य
- स्वच्छता मोहीम
- पर्यावरण निरीक्षण व नोंद
- समाजाचे निरीक्षण व आरेखन
- समाज मंडळींशी चर्चा
- छोटे छोटे प्रयोग
- समाजधारित प्रकल्प
- कृती संशोधन

कृतींची काठिण्य पातळी विद्यार्थी वयोगटानुसार वाढवता येईल. वैयक्तिक वा गटनिहाय कृती देता येतील. महात्मा गांधींनी कृतीतून शिक्षण देत असताना मन, मेंदू व हात याचा उल्लेख त्यासाठीच केला होता कारण कृतीतून मिळालेल्या ज्ञानास भावनेची मेंदूची व प्रत्यक्ष हाताची जोड असते म्हणून ते ज्ञान दीर्घकाळ टिकते.

**३) एकजुटीचे शिक्षण-**

समुदाय सहभाग सहभाग हा समाजाशी संबंधित असणारा भाग आहे.विद्यार्थी व समाज हे एकत्रित येऊन अध्ययन -अनुभव देणा-घेणार असल्याने एकजुटीचे शिक्षण मिळते. संपूर्ण समुदाय एका विशिष्ट समस्येवर, आव्हानावर लक्ष केंद्रित करणार असते.

**ही एकजूट आणता कशी येईल-**

- विद्यार्थ्यांना समाजात जास्तीत जास्त सहभाग होण्याची संधी देणे.
- समाज समस्या शाळा -संस्था व समूह - समुदाय मिळून सोडविणे
- शाळा -संस्था व समाजाने एकमेकांच्या गरजा ओळखून त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे.
- समूहाने शाळा- संस्थांस व शाळा -संस्थांनी समुदायास प्रेरित करण्याचे उपक्रम राबविणे.

वरील तिन्ही बाबीं वेगवेगळ्यापणे पूर्ण होतील असे नाही. त्या एकमेकातही पूर्ण होऊ शकतात व समुदाय सहभाग ही संकल्पना ही केवळ ग्रामीण भागातच राबविता येते असेही नाही. शहरी व डोंगराळ भाग ही यात येतात. तसेच कृतींचे स्वरूप मात्र वेगळे असू शकते इतकेच!

## References

1. National Education Policy-2020
2. https://aese.psu.edu/research/centers/cecd/engagementtoolbox/engagement/what-is-community-engagement
3. https://www.who.int/publications/i/item/9789240010529
4. https://govos.com/blog/what-is-community-engagement/
5. https://sustainingcommunity.wordpress.com/2011/03/21/what-is-community-engagement/
6. https://www.bu.edu/ctl/guides/experiential-learning/
7. https://www.niu.edu/citl/resources/guides/instructional-guide/experiential-learning.shtml#:~:text=%E2%80%9CExperiential%20%5Blearning%5D%20is%20a,Association%20for%20Experiential%20Education%2C%20para.
8. https://oxfordre.com/internationalstudies/view/10.1093/acrefore/9780190846626.001.0001/acrefore-9780190846626-e-175?print&gclid
9. https://students.morris.umn.edu/community-engagement/types-community-engagement
10. https://students.morris.umn.edu/community-engagement/types-community-engagement
11. https://www.lifehack.org/898427/learning-by-doing
12. https://opentextbc.ca/teachinginadigitalage/chapter/4-4-models-for-teaching-by-doing/
13. https://www.pedagogy4change.org/john-dewey/
14. https://www.linkedin.com/pulse/learning-doing-4-reason-why-its-relevant-jatin-mahajan
15. https://www.dns-tvind.dk/examples-of-learning-by-doing/